यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

२९/०९/२०२५

## 'ज्ञानगंगोत्री' या त्रैमासिकासाठी इच्छुक लेखकांकरिता मार्गदर्शनपर ऑनलाईन कार्यशाळेचा अहवाल

## व्याख्याते : प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेने दि. २७/०९/२०२५ रोजी 'ज्ञानगंगोत्री' या त्रैमासिकासाठी इच्छुक लेखकांकरिता मार्गदर्शनपर ऑनलाईन कार्यशाळा दु. २.३० वाजता आयोजित केली होती. सदर त्रैमासिक 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रमात (M.Lib & I.Sc)(P16)' समाविष्ट असून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य (LIB013) या अभ्यासक्रमात ग्रंथालयशास्त्रातील अद्ययावत ज्ञान, घडामोडी आणि नवीन तंत्रज्ञान यांचा समावेश असतो. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता चारही अंकांचे विषय कोणते असावेत व कसे लेखन करावे ह्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी ग्रंथालयशास्त्रातील प्रदीर्घ अनुभव असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक प्रा.डॉ. राजेंद्र कुंभार तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

या व्याख्यानासाठी 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकाचे संपादक मंडळ व तज्ज्ञ सल्लागार मंडळाचे सदस्य तसेच ग्रंथपाल, ग्रंथालय कर्मचारी, ग्रंथालयशास्त्र शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकाचे कार्यकारी संपादक व ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रमुख डॉ. प्रकाश बर्वे यांनी व्याख्याते डॉ राजेंद्र कुंभार सरांचे स्वागत केले व कार्यशाळेची संकल्पना स्पष्ट केली. 'ज्ञानगंगोत्री' त्रैमासिकाचे संपादक व मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी सहभागींचे स्वागत केले व कार्यशाळेचा उद्देश आणि महत्व स्पष्ट केला.

डॉ. राजेंद्र कुंभार सरांनी त्यांच्या व्याख्यानात लेखनासाठी कोणते विषय असावेत, विषयाची मांडणी कशी असावी यावर विस्तृत चर्चा केली. हे त्रैमासिक अध्ययनसाहित्य असल्याने त्या अनुषंगाने लेखन कसे असावे यावरही त्यांनी विचार मांडला. सरांनी लेखकांसाठी मार्गदर्शक तत्वे सांगितली. कार्यक्रमास जवळपास ५० सहभागी ऑनलाईन उपस्थित होते. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरांच्या सत्रात सहभागींनी मोठा प्रतिसाद दिला. डॉ राजेंद्र कुंभार यांनी व्याख्यानानंतर उपस्थितांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. तज्ज्ञ सल्लागार मंडळाचे सदस्य डॉ. रणजीत धर्मापुरीकर सर यांनी लेखनासाठी नवीन तंत्रज्ञानातील संकल्पनांवर चर्चा केली.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शैक्षणिक संयोजक रुपाली गायकवाड यांनी केले.

29.09.2025

डॉ. प्रकाश बर्वे
प्रमुख
ज्ञानस्त्रोत केंद्र

प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा






उपस्थित तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. राजेंद्र कुंभार सर

प्रा. नागार्जुन वाडेकर , डॉ. प्रकाश बर्वे